## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०५-०२-२००९ रोजी पुणे / सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५०० / सातारा | श्री. नारायण विष्णू म्हांगडे रा.मु.पो. परखंदी, ता.वाई, जि.सातारा. | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, वाई, ता.वाई, जि.सातारा | अधिक्षक, भूमी अभिलेख, सातारा, तहसील कंम्पाऊंड, सातारा | मौजे परखंदी येथील ग.नं.१३१, १३२ ची दुरुस्ती, एकत्रिकरण योजना, जाबजबाब, कब्जेपावती व आदेशांच्या प्रती | जबाबाच्या प्रती व्यतिरिक्त अन्य माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे व जबाबाच्या प्रती मिळत नसल्याने त्यांचा फेरशोध घेऊन ३० दिवसांत अपीलकर्त्यास देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्यास १० दिवसात माहितीबाबत कळवावे. |
| २ | ५०५ / सातारा | श्री. शंकर पांडुरंग पवार (कर्नाळे) मु.पो.तांबवे, ता.कराड, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार कराड, ता.कराड, जि.सातारा | तहसीलदार कराड. ता.कराड, जि.सातारा | स.नं. ४४, ५७, ५७३, २४५४, २४५९ व ६२१८ चे फेरफार व ७/१२ चे उतारे इत्यादी | माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकाऱ्यांना लेखी दिले आहे. |
| ३ | ५५२ / सातारा | श्री. शेख अलताफ रहिम हाजी इब्राहिम ईस्टेट, स्टेशन रोड, अहमदनगर | उप विभागीय अधिकारी फलटण उप विभाग, ता.फलटण, जि.सातारा | अपर जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा, जि.सातारा | महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू कोड कलम २५७ खाली रिव्हीजन अर्ज दाखल करण्यास असलेल्या मुदतीचा तपशील व त्यास मुदतीची बाधा होत असल्यास त्याबाबत तपशील देऊन रिव्हीजन मध्ये २५७ प्रमाणे मुदतीचे नियमाची माहिती | अपीलकर्त्यास मुदतीत माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५७३ / सातारा | श्री. विकास रविंद्र मांढरे मु.पो.अभेपूरी, ता.वाई, जि.सातारा | गाव कामगार तलाठी, अभेपूरी, ता.वाई, जि.सातारा | तहसीलदार, वाई, ता.वाई, जि.सातारा | वारस नोंद, ७/१२, खाते उतारा दाखला, उत्पन्नाचा दाखला, करमणूक कर, इ.बाबत माहिती | अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत एकमत. |
| ५ | ५७५ / सातारा | श्री. नारायण लक्ष्मण गायकवाड २२०/८५८२, कन्नमवार नगर नं.१, विक्रोळी (पूर्व), मुंबई-८३ | निवासी नायब तहसीलदार, सातारा, ता.जि.सातारा | तहसीलदार, सातारा, ता.जि.सातारा | मौजे तासगाव व जिहे, ता.जि.सातारा येथे पुनर्वसनांतर्गत जमीनीस श्री. नारायण लक्ष्मण गायकवाड व श्री. नामदेव लक्ष्मण गायकवाड यांच्या नावाची नोंद करुन ७/१२ मिळणेबाबत | ७/१२ वरील दुरुस्तीसाठी आवश्यक कागदपत्रे सादर करणार असल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. माहिती अर्जातील मागणी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ५ (क्र.५००, ५०५, ५५२, ५७३ व ५७५ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत अपील क्रमांक ५०० मध्ये नमूद केले आहे, त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६-०२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०५-०२-२००९ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५१२ / सातारा | कु. मिनाताई विष्णू जाधव द्वाराः श्री अधिकराव अनंत माने जिजाऊ पार्क, अनंत शांती विद्या नगर, सैंदापूर बीजगुणन, पेट्रोल पंपासमोर, कराड-विटा रोड, विद्यानगर, ता.कराड, जि.सातारा | सुधारक शिक्षण संस्था, टेंभू, ता.कराड, जि.सातारा | सचिव सुधारक शिक्षण संस्था, टेंभू, ता.कराड, जि.सातारा | श्री. विजयकुमार स. शिंदे यांचा नेमणूक प्रस्ताव, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता यादी | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याने तक्रार नसल्याचे प्रपत्रात नमुद केले आहे. |
| २ | ५४५ / सातारा | श्री. सुशांत सुभाष मोरे ४, केशर कॉम्प्लेक्स, ३४ पंतांचा गोट, जिल्हा सातारा | सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, २१३० - ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर, | अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, २१३० - ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर, | संस्थे विरुध्द शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी व त्याव्यतिरिक्त व्यक्तींनी न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणांतील माहिती | माहिती व्यापक असल्याने एक महिन्यात अपीलकर्त्यास देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेले अनु. क्र. १ ते २ अपिले (क्र.५१२ व ५४५ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६-०२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०५-०२-२००९ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५२२ / सातारा | श्री. रघुनाथ सावळा जाधव अनमोल, १३, कारंजकर उपनगर, गोंडोलीचे दक्षिणेस जुना हायवे लगत, सातारा | कार्यकारी अभियंता, कण्हेर विकास पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, कृष्णानगर, सातारा | अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे | पाणी परवानगी मिळणे | मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| २ | ५२५ / सातारा | श्री. रघुनाथ सावळा जाधव अनमोल, १३, कारंजकर उपनगर, गोंडोलीचे दक्षिणेस जुना हायवे लगत, सातारा | ग्रामसेवक, कुमठे / पाडळी / निनाम, ता.जि.सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती सातारा, जि.सातारा | बहिणीचा मृत्यूदाखला मिळणे | मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | ५३१ / सातारा | श्री. सचिव चंद्रकांत नाईकनवरे कच्छी निवास, लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | निवासी नायब तहसीलदार खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा | तहसीलदार खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा | श्री. प्रमोद शिंदे, शासकीय रॉकेल विक्रेते, रा.लोणंद यांनी माहे मे ते जुलै २००८ मध्ये केलेल्या रॉकेल वितरणासंदर्भात | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. माहिती सात दिवसात देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ५३२ / सातारा | श्री. बाबुराव भगवंतराव गायकवाड मु.पो.लोहोम, ता.खंडाळा, जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत लोहोम, ता.खंडाळा, जि.सातारा | विस्तार अधिकारी, पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा | सन २००२ ते २००८ अखेर ग्रामसभेच्या सभासदांची संख्या व दिनांक २५-११-२००३ पासून ०२-१०-२००७ अखेर झालेल्या प्रत्येक ग्रामसभेचा अजेन्डा व इतिवृत्ताची प्रत | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. राहिलेली माहिती नि:शुल्क देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्यास माहिती आठ दिवसात द्यावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ५३३ / सातारा | कु. मिनाताई विष्णू जाधव द्वारा: श्री अधिकराव अनंत माने जिजाऊ पार्क, अनंत शांती विद्या नगर सैंदापूर बीजगुणन, पेट्रोल पंपासमोर, कराड-विटा रोड, विद्यानगर, ता.कराड, | मुख्याध्यापक, कै.गोपाळ गणेश आगरकर विद्यालय, टेंभू, ता.कराड, जि.सातारा | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा, जि.सातारा | श्री. विजयकुमार स. शिंदे यांच्या नेमणुकीसंदर्भात प्रस्ताव व शिक्षणाधिकारी यांच्या मान्यतापत्राची प्रत व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता यादी | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. माहिती आठ दिवसात देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ५४३ / सातारा | श्री. सर्जेराव बाबुराव कांबळे शिपाई, एम.जी.एम. कॉलेज, कराड, ता.कराड, जि.सातारा | शाखा व्यवस्थापक, दि.विटा अर्बन को-ऑप.बँक लि., विटा, ता.खानापूर, जि.सांगली | शाखा व्यवस्थापक, दि.विटा अर्बन को-ऑप.बँक लि., विटा, ता.खानापूर, जि.सांगली | अपीलकर्त्याच्या नावे जीप कर्जप्रकरणातील सर्व कागदपत्रे | दि विटा अर्बन को-ऑप.बँक लि. ला माहितीचा अधिकार लागू नसल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ६ (क्र. ५२२, ५२५, ५३१, ५३२, ५३३ व ५४३ / सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६-०२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ७.२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५३०+ ५३१+ ५३२/ कोल्हापूर | श्री. अभिनंदन आण्णासाहेब शिरोटे रा.डॉ.मगदूम सोसायटी, प्लॉट नं.७५, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | १. मुख्याध्यापक, आदर्श विद्यालय कोथळी, ता. शिरोळ २. मुख्याध्यापक, राजगोळी खुर्द हायस्कूल, ता.चंदगड ३. मुख्याध्यापक, राजापूर खिद्रापूर हायस्कूल, राजापूरवाडी, ता. शिरोळ जि.कोल्हापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर जि. कोल्हापूर | शाळेचे जनरल रजिस्टर सन २००६-२००७, २००७-२००८ व २००८-२००९ चा उतारा तसेच इ.५ वी ते १० वी प्रत्येक वर्गातील तुकडीनिहाय विद्यार्थ्यांची माहिती | अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.४.२.२००९ च्या पत्राने लेखी कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १२.२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ७.२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५३५/ कोल्हापूर | श्री. आप्पासाहेब रंगराव चव्हाण रा. २, यश रेसिडेंसी, २४९-बी, ई वॉर्ड, यशोधन हॉस्पिटल समोर, नागाळा पार्क, कोल्हापूर | कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा विभाग, फलटण जि.सातारा | अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे | कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा विभाग, फलटण या कार्यालया मार्फत करण्यात आलेल्या कॅनॉल दुरूस्ती व इतर सर्व कामे या बाबतची माहिती | दि. ७.२.२००९ रोजी उभय पक्षांमध्ये झालेल्या चर्चेनुसार अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे दोघांच्या सोयीनुसार प्रत्यक्ष माहिती दाखविण्याची वेळ निश्चित करून कार्यवाही करण्याचे ठरले. चर्चेत ठरल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही १५ दिवसात पूर्ण करून त्याबाबतचा अहवाल आयोगाकडे सादर करण्यात यावा. |
| २ | ५३७/ कोल्हापूर | श्री.तुकाराम दशरथ बेलवाडे मु. वडकशिवाले पो.महागोंड, ता.आजरा, जि.कोल्हापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडक शिवाले, पो.महागोंड, ता.आजरा, जि.कोल्हापूर | गट विकास अधिकारी, आजरा, ता.आजरा, जि. कोल्हापूर | मिळकत नं.४४-१ब चे परडे (परसू) ही मिळकत अपील-कर्त्याने खरेदी केलेली असताना सदर मिळकतीस दुसऱ्याचे नाव कोणत्या आधारे लावले गेले आहे याबाबतची माहिती | दि.७.२.२००९ रोजी उभय पक्षांमध्ये एकत्रित झालेल्या चर्चेनुसार व जन माहिती अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी ग्राम पंचायत बैठकीमध्ये ३० दिवसांचे आत निर्णय घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही-बाबतची माहिती अपील-कर्त्यास द्यावी व आयोगास अहवाल त्यानंतर आठ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | दिवसाचे आत सादर करावा. |
| ५३९/ कोल्हापूर | श्री. प्रदिप विश्वासराव पाटील पारिजात, प्लॉट नं.४५, मुक्त सैनिक वसाहत, कोल्हापूर | चेअरमन / सेक्रेटरी, एक्स सर्व्हिसमेन को.ऑप.हौ. सोसायटी लि., जवाहरनगर, कोल्हापूर | उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर, जि. कोल्हापूर | एक्स सर्व्हिसमेन को.ऑप.हौ. सोसायटी लि., कोल्हापूर संस्थेच्या संचालक मंडळ सदस्यांनी सादर केलेल्या बंधपत्रा बाबतची माहिती | अपीलकर्ता यांनी दि.६.२.२००९ रोजी दिलेल्या अर्जात नमूद केल्याप्रमाणे उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर शहर यांचेकडून कार्यवाही होत आहे. आयोगाकडील अपील निकाली काढण्यास अपीलकर्ता यांनी मान्यता दिलेली आहे. |
| ५५० / कोल्हापूर | श्री. माजिद इस्माईल शेख ११४०, सी-वॉर्ड, पटवेगार बिल्डिंग भुई गल्ली, बिंदू चौक, कोल्हापूर | इस्टेट ऑफिसर कोल्हापूर महानगर-पालिका, कोल्हापूर | सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगर-पालिका, कोल्हापूर | रेग्यूलर अ.नं. ४८२/९६, ४८७/९६ व ३२३/९७ या अपिलाच्या निर्णयाविरूध्द महानगरपालिकेने अपील केले आहे किंवा कसे, केले असल्यास त्याचा नंबर मिळण्या बाबतची माहिती | दि. ३.२.२००९ च्या अर्जानुसार अपीलकर्त्याने सादर केलेल्या निवेदना-मध्ये अपील स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १६.२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण पांडुरंग कोरगांवकर
१०, अशोक अपार्टमेंट्स, माळी कॉलनी,
टाकाळा, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अप्पर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पार्श्वनाथ को.ऑप.बँक लि.,
६६९ ई, शाहूपुरी, ३री गल्ली, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४० / कोल्हापूर / २००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १५.९.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १७.९.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | -- |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १९.११.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** कर्ज खात्यासंदर्भातील सर्व माहिती व एन.पी.ए. यादी व त्यास बँकेने सन २००१ ते २००७ सालाकरिता केलेल्या तरतुदीबाबत माहिती | |

विवेचन

अपीलकर्ता श्री. नारायण पांडुरंग कोरगावकर यांनी स्वतःच्या कर्ज खात्यासंबंधीची माहिती पार्श्वनाथ को. ऑप. बँक लि., कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. त्यांनी माहिती नाकारल्यामुळे श्री. कोरगांवकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम

१९६० चे कलम ३२ अन्वये अर्जदार सभासदाला माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिला. तरीही आपल्याला माहिती मिळाली नाही, या कारणावरून श्री. कोरगावकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्या ब्रँकेला शासनामार्फत कोणत्याही प्रकारचा वित्त पुरवठा अथवा अनुदान मिळाले नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, अशी भूमिका बँकेने प्रथमपासून घेतली आहे. नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अलीकडेच दिला आहे. त्यामुळे अपील निकाली काढावे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी दि.७.२.२००९ रोजी आयोगाला सादर केले आहे.

नागरी सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार बँकेची भूमिका मान्य करण्यात येत आहे. मात्र नियंत्रक अधिकाऱ्याच्या अधिकार कक्षेत येणारी माहिती मिळवून देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये बंधनकारक आहे. नियंत्रक अधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२ नुसार सभासदाला आवश्यक असलेली माहिती बँकेने दिली पाहिजे, बँकेकडून ही माहिती प्राप्त करून घेऊन अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्याला ती पुरवठा करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संबंधित माहिती अपीलकर्त्यास पुरविण्याची व्यवस्था करून अनुपालन अहवाल आयोगाला दि. ५.३.२००९ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल कुंडलिक केंबळे
रा. ब्लॉक नं.१४, समाजसेवा को.ऑप.हौ.सोसायटी,
भोसलेवाडी, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लिपिक, विधी विभाग,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४७ / कोल्हापूर / २००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.९.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.११.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.११.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** दिवाणी दावा क्र.१००/८५ व २८६/८९ संबंधित तडजोडीची सत्यप्रत व दि.१७.१२.२००३ रोजीच्या आयुक्त यांच्या आदेशा संबंधित इतर माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुनिल कुंडलिक केंबळे यांनी दि.२४.९.२००८ च्या अर्जान्वये माहितीची मागणी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, विधी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांच्याकडे केली होती. सदर माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने दि. १०.११.२००८ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांच्याकडे प्रथम अपील केले.

अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २८.११.२००८ रोजी सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी महानगरपालिकेच्या पॅनलवरील संबंधित विधीज्ञ यांचेशी चर्चा करून पंधरा दिवसात अपीलकर्त्यास विना शुल्क माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. पंधरा दिवसात माहिती प्राप्त न झाल्याने श्री. केंबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. अपीलकर्ता यांना दि. २०.१२.२००८ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती समाधानकारक मिळाल्याने आयोगाकडे दाखल केलेले अपील निकाली काढण्याबाबत लेखी कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ११ .२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ७.२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५५४/ कोल्हापूर | श्री. मल्लिकार्जुन शंकर धोत्रे रा. २३४/१ब, २ब, प्लॉट नं.१० गाडवे पेट्रोल पंपा-जवळ, बोलवाड रोड, मिरज, जि.सांगली | शासकीय तंत्र निकेतन, विद्यानगर, कोल्हापूर, जि.कोल्हापूर | शासकीय तंत्र निकेतन, विद्यानगर, कोल्हापूर, जि.कोल्हापूर | डॉ. जे.जे. मगदूम पॉलिटेक्नीक, जयसिंगपूर, जि. कोल्हापूरची दि. २४ जून व १ जुलै २००८ रोजी जी तपासणी करण्यात आली, त्याचे प्रयोजन, उद्देश काय व सदर तपासणी अहवालाची प्रत मिळणेबाबत | अपीलकर्त्यास माहिती मिळाली असल्याने अपील मागे घेत असल्याबाबतचे निवेदन त्यांनी दि. ५ फेब्रुवारी २००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे सादर केले. त्याची प्रत अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांचे निवेदनासोबत आयोगाकडे सादर केली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २६.२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ७.२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५६२/ कोल्हापूर | श्री. पांडुरंग मारूती पाटील रा. ३९०९/३, शांतीनगर, मुक्त सैनिक सोसायटी जवळ, मु.पो.जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर | तहसीलदार, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | पीकपाणी व हिस्सेवारीची नोंद करावी, अर्ज असूनही तशी नोंद केलेली नाही. | माहिती देण्यात आली आहे. मात्र अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे. त्यांनी उपलब्ध करून दिलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याचा मूळ मागणीचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| २ | ५६१/ कोल्हापूर | श्री. पांडुरंग मारूती पाटील | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या., परिमंडल कार्यालय, कोल्हापूर | मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या., संवसु परिमंडल कार्यालय, कोल्हापूर | बढतीची मानीव तारीख ३.८.१९७४ अशी असल्याने तेथून वेतन निश्चित करून फरकाची रक्कम अदा करावी. | अपीलकर्त्याच्या मूळ मागणीवर कार्यवाही चालू असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. श्री. पाटील हे मंडल कार्यालय कोल्हापूरच्या अखत्यारी बाहेरील हडपसर पुणे, स्थापत्य विभाग, कोल्हापूर मंडल कार्यालय, कल्याण इ. विविध ठिकाणी कार्यरत असल्यामुळे त्याबाबतची |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कागदपत्रे मागवून घेऊन लवकर कार्यवाही करण्याच्या सूचना कोल्हापूर मंडल कार्यालयास देण्यात आलेल्या असून त्यानुसार कार्यवाही चालू आहे, असे अपिलीय प्राधिकारी यांनी दि.६.२.२००९ रोजीच्या पत्रात नमूद केले आहे. मूळ मागणीचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १२.२.००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ७.२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५६३ / कोल्हापूर | श्री. जवाहरलाल आण्णासाहेब रोटे ६४४ ई, १ली गल्ली, शाहूपुरी, कोल्हापूर | अतिरिक्त परिवहन व्यवस्थापक, कोल्हापूर महानगर-पालिका परिवहन उपक्रम, कोल्हापूर | अतिरिक्त परिवहन व्यवस्थापक कोल्हापूर महानगर-पालिका परिवहन उपक्रम, कोल्हापूर | ज्येष्ठ नागरिकांना शासनाने दिलेले ओळखपत्र मान्य नाही. के.एम.टी. मधून ओळखपत्र काढलेस ज्येष्ठ नागरिकांना . के. एम. टी. मधील प्रवासात ५० टक्के सवलत आहे. | ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक कागदपत्रे व रहिवास दाखले घेण्यात येऊन ६५ वर्ष पूर्ण असणाऱ्या आणि के.एम.टी. उपक्रमाची बस सेवा सुरू असणाऱ्या शहर व ग्रामीण भागातील प्रवाशांना ओळखपत्र देणेत येत आहेत. के.एम.टी. उपक्रम हा महानगर-पालिकेचा अंगीकृत उपक्रम असून ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्या-मध्ये सवलत देणेचा आणि त्यासाठी आवश्यक कागद-पत्रे घेण्याचा अधिकार परिवहन उपक्रमास आहे. अपीलकर्त्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १३ .२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ७.२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५६४ / कोल्हापूर | श्री. गुरूदास पांडुरंग गावडे मु.पो.हेरे, ता.चंदगड, जि.कोल्हापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत हेरे, ता.चंदगड, जि. कोल्हापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती चंदगड, जि.कोल्हापूर | दि. १५.७.२००७ ते दि.२२.८.२००८ पर्यंत झालेल्या ग्राम-सभेचे इतिवृत्त तपासून आवश्यक माहितीच्या प्रती व एकूण पाच मुद्दयांची माहिती | निरीक्षण व आवश्यक माहिती मोफत देण्याबाबत तीन घटकांमध्ये एकमत झाले. अपीलकर्ता यांनी अपील काढून टाकण्यास मान्यता दिलेली आहे. चर्चेत ठरल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्त्यास माहिती द्यावी. |
| २ | ५६५/ कोल्हापूर | श्री. महादेव आप्पा मोरे मु.पो.बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती आजरा, जि.कोल्हापूर | मौजे बहिरेवाडी येथील जल-स्वराज्य प्रकल्पा-बाबत, तसेच बाराव्या वित्त आयोगातून केलेल्या कामा बाबतची एकूण पाच मुद्दयां-बाबतची माहिती | जलस्वराज्य प्रकल्पा-बाबत कोणतीही शंका अथवा तक्रार राहिलेली नसल्याचे अपीलकर्त्याने निवेदनात नमूद करून संपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढण्यास मान्यता दिली. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १६.२.००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ७.२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | ५७८ / कोल्हापूर | व्यवस्थापकीय संचालक, श्री दत्त सहकारी साखर कारखाना लि.आसुर्ले-पोर्ले, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर | व्यवस्थापकीय संचालक, श्री दत्त सहकारी साखर कारखाना लि.आसुर्ले-पोर्ले, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर | प्रादेशिक सह संचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर |

| मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|
| दि.१.४.२००० ते दि. १९.१२.२००५ या कालावधीत श्री दत्त सहकारी साखर कारखाना लि., आसुर्ले-पोर्ले या कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी संचालक यांनी केलेल्या दौ-या संबंधातील माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेमध्ये झालेल्या चर्चेनुसार माहिती पाच वर्षाची असल्याने याबाबतचे अभिलेख शोधून एक महिन्यात माहिती देण्याबाबत एकमत झाले व अपील निकाली काढण्यास मान्यता दिली.<br>अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी दि. ६.२.२००९ रोजी आयोगास सादर केलेल्या निवेदनामध्ये प्रथम अपिलाबाबत दिलेल्या निर्णयामध्यें माहिती अधिकारी यांना माहिती देण्यास विलंब झालेला असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० नुसार रू.१०००/- शास्ती (दंड) लावलेली असल्याचे नमूद केले आहे. तथापि शास्ती लावण्याचे अधिकार फक्त आयोगास आहेत. मात्र माहिती १५ दिवसांत देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि. ११.५.२००६ रोजी दिला होता. त्यानंतर अडिच वर्षे उलटल्या-नंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास एक महिन्याची मुदत मागत आहेत, हे योग्य नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी लावलेली शास्ती जणू आयोगानेच लावली असल्याचे मानून कायम करण्यात येत आहे. माहिती त्वरित देणे आवश्यक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत अपीलकर्त्यास माहिती न दिल्याने अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी दि.११.५.२००६ रोजी पारित केलेला शास्तीबाबतचा आदेश कायम करण्यात येत आहे. सदरची शास्ती फेब्रुवारी २००९ या महिन्याच्या वेतनातून वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १८ माहितीचा अधिकार ००७००१६१' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही, तसेच जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत माहिती अपीलकर्त्यास दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. १८.२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास विश्वनाथ मेंदनकर
मु.पो.कुरुळी, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन, ग्रामोन्नती मंडळ,
नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, ग्रामोन्नती मंडळाचे,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास विश्वनाथ मेदनकर
मु.पो.कुरुळी, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन, ग्रामोन्नती मंडळ,
नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.दत्तात्रय लक्ष्मण गाडगे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, ग्रामोन्नती मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे
तत्कालीन श्री.एच.बी.होले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.२.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | वाणिज्य विभागाचा सन १९९७-२००६ पर्यंतचा कार्यभार किती आहे, या काळातील एकूण किती व कोणते प्राध्यापक कार्यरत आहेत, अर्जदारास १९९९-२००० अर्धवेळ नेमणुकीचे कारण, अर्धवेळ प्रस्तावासाठी विद्यापीठास केलेला खुलासा, अर्जदारास २००१ मध्ये तासिका तत्त्वावर कार्यभार का दिला, २००२ मध्ये हजेरीपत्रकातून नाव कमी केले व पुन्हा कशामुळे समाविष्ट केले, याची सूचना अर्जदारास दिली का, दि.३०.६.२००६ चे अर्जाबाबत काही कळविले आहे का, महाविद्यालयातील फेब्रुवारी, मार्च,जून,जुलै २००६ मधील प्राध्यापकांचा हजेरीपटावरील तपशील, अर्जदाराऐवजी इतर प्राध्यापकाची नेमणूक केली असल्यास तपशील, एका सत्रात एका विषयाच्या सरासरी तासिका किती आहेत, या सत्रासाठी प्राध्यापकांना दिले जाणारे मानधन किती, तसेच या काळातील देय वेतन, मानधन, आगाऊ रक्कम कार्यभाराचे स्वरुप, उपस्थिती इत्यादी. |

## विवेचन

अपीलकर्ता प्रा.विलास विश्वनाथ मेदनकर यांनी ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे यांचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तालुका जुन्नर, जि.पुणे येथील वाणिज्य विभागातील सन १९९७ ते २००६ या कालावधीतील प्राध्यापकांच्या अनुषंगाने २१ मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती न मिळाल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन, ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव, ता.जुन्नर यांच्याकडे केलेल्या अपिलाची दखल त्यांनी घेतली नाही, या कारणावरुन प्रा.मेदनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाने दि.२७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी माहितीबाबत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

यापूर्वी कळविलेले शुल्क भरुन प्रा.मेदनकर यांनी माहिती घेतलेली नाही व आपण नि:शुल्क माहिती समक्ष देण्यास तयार असूनही प्रा.मेदनकर ती स्वीकारण्यास तयार नाहीत, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री.सु.शेवाळे यांनी प्रपत्रात नमूद केले. परंतु आपल्याला मूळ अर्जाप्रमाणे माहिती मिळत नसल्यामुळे आपण ती स्वीकारलेली नाही, असे प्रा.मेदनकर यानी स्वतंत्र पत्राद्वारे कळविले. आपल्या मूळ अर्जाप्रमाणे माहिती मिळावी, या

माहितीअभावी नुकसान झाल्यामुळे भरपाई मिळावी व जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, अशी मागणी प्रा.मेदनकर यांनी प्रपत्रात व स्वतंत्र पत्राद्वारे केली.

प्रा.मेदनकर यांनी मागितलेली माहिती व कागदपत्रांच्या सत्यप्रती तयार असल्याचे त्यांना वारंवार पत्राद्वारे कळविण्यात आले आहे, शुल्क भरण्याबाबतही त्यांना कळविण्यात आले होते, परंतु त्यांनी शुल्क भरले नाही, तसेच नंतरही अनेक पत्रे पाठवूनसुध्दा माहिती नेलेली नाही, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सु.शेवाळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एच.बी.होले यांनी व अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन, ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव, ता.जुन्नर श्री.दत्तात्रय लक्ष्मण गाडगे यांनी आयोगाला यापूर्वी संबंधित पत्रांच्या प्रतीसह अवगत केले होते. सुनावणीत त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. संस्थेने दहा रुपये शुल्क कळविले होते, आपण ते भरण्यास तयार असल्याचे सांगितले होते, परंतु शुल्क भरावयास गेलो असता पावतीपुस्तक हिशेब तपासणीसाठी गेले असल्याने पैसे भरण्याबाबत नंतर कळविले जाईल, असे आपल्याला संस्थेतून सांगण्यात आले, त्यामुळे आपण शुल्क भरु शकलो नाही. त्यानंतर आपल्याला काही कळविले गेले नाही व आपल्याला माहिती मिळाली नाही त्यामुळे आपण अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन, ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे यांच्याकडे अपील केले. त्यानी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून आपल्याला आयोगाकडे अपील करावे लागले, असे प्रतिपादन प्रा.मेदनकर यांनी केले. एकूण २४४ रुपये शुल्क भरण्याबाबत व माहिती तयार असल्याबाबत प्रा.मेदनकर यांना अनेक पत्रांद्वारे कळविण्यात आले आहे. प्रा.मेदनकर सन १९९४-९५ पासून महाविद्यालयाच्या सेवेत आहेत. जून २००६ मध्ये त्यांना कामावरुन कमी करण्यात आले. विशिष्ट मुदतीतील कामाबद्दलचा सर्व मोबदला त्यांना देण्यात आला आहे. संस्थेकडे त्यांनी अपील केलेले नाही. त्यामुळे त्याची दखल घेण्याचा प्रश्न आला नाही, असे प्राचार्य एच.बी.होले व श्री.दत्तात्रय लक्ष्मण गाडगे यांनी नमूद केले.

उभय बाजूंचे निवेदन व सादर केलेली कागदपत्रे पाहता, एकमेकांना दिलेली पत्रे आपल्याला मिळाली नसल्याचे उभय बाजूंचे म्हणणे आहे. महाविद्यालयाच्या जावक नोंदीमध्ये पत्रे पाठविल्याचे नमूद आहे. अपीलकर्त्याकडे पत्रांची पोहोच नाही. मागितलेली माहिती तयार असल्याचे संबंधित प्रतींसह जन माहिती अधिकाऱ्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळीही

आयोगापुढे सादर केले होते. हे लक्षात घेता माहिती नाकारण्याची संस्थेची भूमिका दिसत नाही. देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने स्वीकारावयास हवी होती. अपीलकर्त्याने मागितलेली संपूर्ण माहिती एक आठवड्याच्या आत अपीलकर्त्यास द्यावी व अपीलकर्त्याने ती स्वीकारावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. त्यानुसार त्याच दिवशी माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२.२.२००९**

५८-६१

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ०७/०२/२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्यांचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७७७ / सांगली | श्री.दत्तात्रय मोहन पेटकर ११५२अ, विष्णू गल्ली, मु.पो.ता.तासगाव, जिल्हा सांगली | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज, जिल्हा सांगली | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर | सिटी स.नं.५४/१९२ कुपवाड येथील जमीन राज्य मार्ग क्र.१४२ मध्ये गेल्याने जमिनीची नुकसान भरपाई मिळणेबाबत | अपीलकर्त्याने प्रकरण निकाली काढण्याबाबत प्रपत्रात नमूद केले असले तरी अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| २ | ७७१ / सांगली | श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे समर्थ खादी भंडार, मेन रोड, सांगली | माहिती अधिकारी, वुमन्स एज्युकेशन सोसायटी, व्दारा गरवारे कला महाविद्यालय, एस.टी.स्टॅण्ड रोड, सांगली | अपिलीय अधिकारी, वुमन्स ऐज्युकेशन सोसायटी, व्दारा गरवारे कला महाविद्यालय, एस.टी.स्टॅण्ड रोड, सांगली | सन २००३ ते २००८ ची कार्यकारणीची यादीबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती | जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती १५ दिवसांत देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ८३४ / सांगली | श्री.सुभाष बजलाल व्होरा तर्फे वकील, श्री.बाळासाहेब मधुकर पाटील, १५३६, शकुंतला निवास गणेशनगर, सांगली | सहसंचालक, साखर (उप पदार्थ), साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य , पुणे ५ | साखर संचालक, (प्रशा), महाराष्ट्र राज्य, पुणे | सन १९९९ ते २००७ या कालावधीत श्री माणगंगा सहकारी साखर कारखाना लि., सोनार सिध्दनगर, पो.ता.आटपाटी, जिल्हा सांगली यांनी गॅलेक्सी केबल इंडस्ट्रीज व समीर ट्रेडर्स ,एम आय डी सी, सांगली यांच्या मध्ये झालेल्या खरेदी-विक्री संबंधातील माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२२/२/२००९ पर्यंत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ३ (क्र.७७७, ७७१ व ८३४ / सांगली ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. वरील ज्या अपिलांमध्ये विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-०२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे "विशेष अपील निर्गत कार्यक्रम" दिनांक ७-२-२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ८११/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | वैद्यकीय आरोग्य अधिकारी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | सन १९९० ते माहे जुलै २००८ या कालावधीतील डायग्नोस्टिक सेंटर्स फिजिओथेरपी मशिन्स इत्यादीबाबत एकूण ५ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २. | ८३६/ सांगली | श्री.सुजित गजाराम काटे व्दारा सचिन मेन्स वेअर, संजयनगर, १०० फुटी रोड, ता. मिरज, जिल्हा सांगली | प्रशासन अधिकारी, (आस्था) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उप आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | सन १९९८ ते माहे सप्टें. २००८ या कालावधीतील पदोन्नती, महासभा ठराव ३३, दि. ११/४/०८ ची प्रत ३३ ची प्रत एकूण ४७ मुद्दयांची माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ८३३/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जिल्हा सांगली | प्रशासन अधिकारी, सर्व शिक्षा अभियान, सांगली मिरज आणि कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली | अतिरिक्त आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | महानगरपालिकेच्या शाळा क्र.४२ व ४४ च्या बांधकामाच्या अनुषंगाने दोन मुद्दयांची माहिती | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ८३२/ सांगली | श्री.अनिल राजाराम बाबर म्हैशाळवेस, भीमनगर, ता.मिरज, जिल्हा सांगली | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मिरज जिल्हा सांगली | तहसीलदार तहसील कार्यालय, मिरज जिल्हा सांगली | रेशनिंग दुकानदार यांचे विरुध्द दि.१९/४/२००८, २१/४/२००८, १२/८/२००८ व दि.६/९/२००८ या कालावधीत केलेल्या तक्रारीबाबत | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगास कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ७८४/ सांगली | श्री.कृष्णा भाऊ सुर्यवंशी मु.पो.सावंतपूर, ता.पलूस, जिल्हा सांगली | निवासी तहसीलदार तहसील कार्यालय पलूस, जिल्हा सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय पलूस जिल्हा सांगली | मौजे आंधळी गट ६८५, ६८६, ६८३, ६५३ व ६५५ मध्ये गाडी रस्ता खुला करण्याबाबत | प्रस्तुत अपिलामध्ये यापूर्वी २१५ व ३१७/सांगली मध्ये दिलेले आदेश कायम ठेवण्यात येत आहे. |
| ६ | ७७८/ सांगली | श्री.दत्तात्रय मोहन पेटकर R/०११५२३अ, विष्णू गल्ली, मु.पो.ता.तासगाव, जिल्हा सांगली | अव्वल कारकून जिल्हाधिकारी कार्यालय सांगली + | भूसंपादन समन्वय अधिकारी, भूमी संपादन शाखा, सांगली | स्वत: सादर केलेल्या अर्जाच्या व कागदपत्राच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत | अपीलकर्त्यास १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ७ | ८३१/ सांगली | श्री.अनिल राजाराम बाबर म्हैशाळवेस, भीमनगर, मिरज ता. मिरज, जिल्हा सांगली | निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार कार्यालय, मिरज | तहसीलदार, तहसील कार्यालय, मिरज | तहसील कार्यालय, मिरज या कार्यालयाच्या आवारातील झाडाखालील अनधिकृत मुद्रांक विक्रेत्याच्या कारवाईबाबत | अपीलकर्त्याने माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास कळविले आहे. |

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेले अनु.क्र. १ ते ७ येथील अपीले (क्र. ८११, ८३६, ८३३, ८३२, ७८४, ७७८ व ८३१ / सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

(२) विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षांमध्ये एकमत झाले आहे असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधीत मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११-०२-२००९.